# संवेदनशील पोलीस

सत्र क्र.५२



पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ, मुंबई.
पोलीस कँप, विजय नगर, मरोळ, अंधेरी (पुर्व)—५९
फोन नं:०२२ २९२५०३२०,ई—मेल:prin.ptsmarol@mahapolice.gov.in

# आमचे प्रेरणास्थान


शहिद तुकाराम ओंबळे
प्रशिक्षणार्थी – सन १९७८
पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ, मुंबई
याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे

# आमचे मार्गदर्शक



मा.श्री.दत्ता पडसलगीकर, भा.पो.से.
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य, मुंबई.



मा.श्री. संजय सक्सेना, भा.पो.से.
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# संवेदनशील पोलीस

## सत्र क्र.५२
## सन – २०१७ – १८

| संवेदनशील पोलीस | अनुक्रमाणिका | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **संपादक व प्रकाशक**<br>**सोमनाथ घार्गे**<br>प्राचार्य,<br>पोलीस प्रशिक्षण केंद्र,<br>मरोळ, मुंबई. | प्रमुख अतिथी यांचा प्रशिक्षणार्थींना संदेश | ०० |
| | अपर पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके यांचा प्रशिक्षणार्थींना संदेश | ०० |
| | संपादकीय | ०० |
| | सन २०१७ – १८ राबविण्यात आलेले नाविण्यपुर्ण उपक्रम | ०१ |
| | प्रिती संगम – विश्रामगृह | ०२ |
| **सहसंपादक**<br>**चंद्रशेखर सावंत**<br>उप प्राचार्य,<br>पोलीस प्रशिक्षण केंद्र,<br>मरोळ, मुंबई. | साई बांगुर्डा – दत्तकग्राम योजना | ०३ |
| | गांडुळखत प्रकल्प | ०४ |
| | अद्ययावत ग्रंथालय | ०५ |
| | सुसज्ज भोजनालय | ०६ |
| **अंतर्गत व्यवस्थापन**<br>हेमंत काळे, पो.निरीक्षक<br>स्नेहा गिरी, पो.निरीक्षक<br>चेतन लोखंडे, पो.उप नि. | मॉडेल पोलीस स्टेशन / गुन्हे देखावा दालन | ०७ |
| | औषधी वनस्पती नर्सरी / मध्यवर्ती भांडारगृह | ०८ |
| | महाराष्ट्र पोलीस स्थापना दिन – २०१८ | ०९ |
| | महाराष्ट्र पोलीस स्मृतिदिन २०१८ | १० |
| **रचना व टंकलेखन**<br>दत्ता म्हेत्रे, सहा.पो.उप नि.<br>न.प्र.पो.शि.रेहान ऐजाज हाशमी<br>न.प्र.पो.शि.सुशिल श्रीराम चनगोले | सन २०१७ – १८ पोलीस महासंचालक सन्मान चिन्हाचे मानकरी | ११ |
| | आंतरवर्ग व बाहयवर्ग प्रशिक्षण | १२ |
| | व्यक्तीमत्व विकास | १३ |
| | यशस्वी कामगिरी | १४ |
| | विशेष उपक्रम | १५ |
| | विविध तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने | १६ |
| **मुखपृष्ठ व सजावट**<br>ज्ञानदीप पाटील<br>संगणक व सायबर तज्ञ | विविध मार्गदर्शनपर प्रशिक्षणाचे व उपक्रमाचे आयोजन | १८ |
| | लेख व कविता | १९ |
| | कवी मनाचे पोलीस – पुस्तक प्रकाशन | २९ |
| **छायाचित्रण**<br>शशीकांत पाटील, सहा.पो.उप नि.<br>प्रथमेश चव्हाण, पो.शि. | प्रशिक्षणार्थ्यांना घडविणारे शिल्पकार | ३० |
| | मंत्रालयीन व इतर कर्मचारी | ३१ |
| | प्रशिक्षणार्थ्यांचे पथकनिहाय छायाचित्रे | ३२ |
| | सन २०१७ –१८ आमचे सेवानिवृत्त सहकारी | ४० |
| | प्रस्तावित उपक्रम | ४२ |

**टिप :** सदर स्मरणिकेत प्रकाशित झालेल्या कविता व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## सत्र क्र.५२ चे दीक्षांत संचलन सोहळयाचे प्रमुख अतिथी



**मा.श्री.बिपिन बिहारी,** भा.पो.से.
पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण
महामंडळ, मुंबई.

## प्रशिक्षणार्थींना संदेश

पोलीस शिपाई हा पोलीस दलाचा कणा आहे. पोलीस शिपाई यांचा नेहमीच जनतेशी संबंध येत असतो, त्यामुळे त्यांची जबाबदारी अत्यंत महत्वाची ठरते.

नवप्रविष्ठ पोलीस प्रशिक्षणार्थी यांना पोलीस प्रशिक्षण केंद्र येथे कायदा व सुव्यवस्था तसेच पोलीस कामकाजाचे प्रशिक्षण देऊन त्यांचा सर्वांगीण विकास केला जातो. त्यामुळेच हे प्रशिक्षणार्थी भविष्यात पोलीस दलाचा महत्वाचा आधारस्तंभ म्हणुन महत्वाची कामगिरी बजावतात.

पोलीस विभागाचे अत्यंत महत्वाचे कर्तव्य म्हणजे कायद्याचे राज्य अबाधित ठेवणे हे महत्वाचे काम आपल्या खांदयावर आहे. प्रशिक्षण केंद्रामध्ये दिलेल्या खडतर प्रशिक्षणामुळे कोणत्याही कसोटीच्या क्षणी ही जबाबदारी तुम्ही सक्षम रितीने पार पाडाल अशी मला पुर्ण आशा आहे.

आज दिक्षांत संचलनाच्या निमित्ताने आपण महाराष्ट्र पोलीस दलाच्या गौरवशाली परंपरेचे वारसदार ठरणार असून, पोलीस म्हणून दीन दुबळयांची सेवा करणे, अबला, जेष्ठ नागरिक यांना तात्काळ मदत करणे. तसेच सामाजिक सुरक्षा, जनहिताच्या संरक्षणाचे कामकाज आणि अखंड भारताच्या एकोप्यासाठी आपण कार्यरत रहाल अशी सदिच्छा व्यक्त करतो.

पोलीस प्रशिक्षण केद्रातील सर्व अधिकारी, प्रशिक्षक आणि कर्मचारी यांनी वर्षभर केलेल्या अथक परिश्रमासाठी मी आपले मन:पुर्वक अभिनंदन करतो.

जय हिंद.......

दि. २५ जुलै २०१८



## प्रशिक्षणार्थींना संदेश


**मा. श्री. संजय सक्सेना,** भा.पो.से.
अपर पोलीस महासंचालक,
प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.


पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ येथे आज दीक्षांत संचलन होत आहे. आजचा दिवस म्हणजे आपण सर्व पोलीस प्रशिक्षणार्थ्यांसाठी अत्यंत जबाबदारीचा व आनंदाचा आहे. पोलीस शिपाई म्हणून महाराष्ट्र पोलीस दलात मी आपले स्वागत करतो.

या पोलीस प्रशिक्षण केंद्रात आपण सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांविरूध्द प्रभावी कारवाई करण्याचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण घेऊन समाज सुरक्षेचा विडा हातात उचलला आहे. संपुर्ण पोलीस दलात पोलीस शिपाई यांची संख्या सर्वात जास्त आहे. त्यामुळेच आपली भूमिका ही महत्वाची व जबाबदारीची ठरते. सध्या पोलीस दलात पोलीस शिपाई म्हणुन पदवीधर, उच्चपदवीधर तरूण भरती होत आहेत. ही खुप चांगली बाब आहे.

या वर्षी प्रामुख्याने ''व्हर्च्युअल क्लासरूम'' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यामध्ये आपण सर्व यशस्वी झालो आहोत. महाराष्ट्रातील सर्व पोलीस प्रशिक्षण केंद्र, व्हर्च्युअल क्लासरूम प्रकल्पाव्दारे जोडण्यात आलेली आहेत. तज्ञ व्याख्याते बोलावून त्यांची व्याख्याने 'e- STUDIO' मधुन प्रक्षेपित केली जातात. व्हर्च्युअल क्लासरूम प्रकल्प हा महाराष्ट्र पोलीस दलाचा महत्वाकांक्षी प्रकल्प ठरला आहे.

महाराष्ट्र पोलीसांचे ब्रिदवाक्य ''सदरक्षणाय खलनिग्रहणाय'' याला अनुसरून पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये पोलीसांना सज्जनांशी चांगले वागुन गुन्हेगारांना जरब बसेल असे प्रशिक्षण देऊन त्यांच्यामध्ये सकारात्मक परिवर्तन केले जाते. या प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण घेतलेला प्रत्येक पोलीस शिपाई जनहितासाठी व समाज सुरक्षेसाठी काम करून लोकांमध्ये आपल्या कामाच्या माध्यमातुन विश्वास संपादन करेल व महाराष्ट्र पोलीस दलाच्या लौकीकामध्ये भर टाकेल अशी मी आशा व्यक्त करतो.

पोलीस प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थ्यांना घडविण्यात मोलाची भूमिका पार पाडलेल्या सर्व अधिकारी, प्रशिक्षक आणि कर्मचारी यांचे मी अभिनंदन करतो. तसेच पोलीस शिपाई प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या पुढील भवितव्यासाठी आणि कर्तव्यासाठी शुभेच्छा व्यक्त करतो .

जयहिंद...

दि. २५ जुलै २०१८

# संपादकीय




**श्री. सोमनाथ घार्गे**

**प्राचार्य**

**पोलीस प्रशिक्षण केंद्र,मरोळ,मुंबई**


पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ, मुंबई तर्फे' ''***संवेदनशील पोलीस***'' ही वार्षीक स्मरणिका प्रकाशित करताना मला मनापासुन आनंद होत आहे. महाराष्ट्र राज्यामधील पोलीस प्रशिक्षणाची सुरूवात प्रथमत: मुंबई येथे झाली. मुंबई पोलीस प्रशिक्षण केंद्राची स्थापना सन १९६६ साली नायगांव येथे झाली. त्यानंतर १९७५ साली या प्रशिक्षण केंद्राचे स्थलांतर मरोळ येथे करण्यात आले. नवप्रविष्ठ पोलीस शिपायांना पोलीस खात्यातील मुलभुत प्रशिक्षण देण्याचे काम गेली ५२ वर्ष हे पोलीस प्रशिक्षण केंद्र अव्याहतपणे करीत आहे. दि. २६/११/२००८ च्या मुंबई हल्ल्यात स्वत:च्या प्राणाची आहुती देऊन अजमल कसाब या दहशतवादयाला जिवंत पकडणारे शहिद तुकाराम ओंबळे यांनी १९७८ मध्ये याच प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेतले होते. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

या वर्षभरात अनेक नवीन उपक्रम राबविण्यात आले त्यामध्ये विशेष करुन महाराष्ट्र पोलीस दलाच्या प्रशिक्षणामध्ये माईलस्टोन ठरणारा ''व्हर्च्युअल क्लासरुम प्रकल्प'',गांडुळ खत प्रकल्प, प्रिती संगम विश्रामगृह, संगणकीकृत वाचनालय, साई बांगुर्डा दत्तक गांव योजना, वनौषधी नर्सरी, यशदा मार्फत पायाभुत प्रशिक्षण, व्यक्तीमत्व विकास उपक्रम, प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षण इत्यादींचा समावेश आहे. तसेच या वर्षापासुन '' भावनिक प्रज्ञावंत पोलीस '' हा नविन विषय सुरू करण्यात आला आहे. यामुळे प्रशिक्षणार्थ्यांचा भावनांक निश्चितच सुधारणार आहे. भावनिक प्रज्ञावंत पोलीस प्रशिक्षणाच्या माध्यमातुन प्रशिक्षणार्थ्यास लोकभावनेचा आदर करून संवेदनशीलतेने आणि कर्तव्यनिष्ठेने कामकरण्याची प्रेरणा मिळते.


आम्ही या वर्षीची ''*संवेदनशील पोलीस* '' स्मरणिका व खऱ्या अर्थाने घडलेला संवेदनशील प्रज्ञावंत पोलीस आपल्या महाराष्ट्र पोलीस दलास सेवेसाठी सुपूर्द करताना आम्हास अत्यंत आनंद होत आहे. प्रशिक्षणार्थींना घडवितांना मला उपप्राचार्य, सर्व आंतरवर्ग अधिकारी, बाहयवर्ग अधिकारी, बाहयवर्ग प्रशिक्षक, मेस कर्मचारी, सफाई कामगार, मोची, धोबी, टेलर या सर्वांचे सहकार्य लाभले त्यांचे मी अभिनंदन करतो.

सर्व प्रशिक्षणार्थ्यांना मन:पुर्वक शुभेच्छा !

धन्यवाद ....

दि. २५ जुलै २०१८

## e-studio व्हर्च्युअल क्लासरूम प्रकल्प



- उदघाटन दि. १३/०६/२०१८
- शुभहस्ते:— मा. श्री. सतीशचंद्र माथुर, माजी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई

**वैशिष्टये**

- अत्याधुनिक ई—लर्निंग व्यवस्था
- अत्याधुनिक ॲकोस्टीक ई—स्टुडीओव्दारे प्रशिक्षण
- एकाचवेळी २२५ क्लासरूम मध्ये तज्ञांचे व्याख्यान प्रक्षेपित करता येते.
- टु वे कम्युनिकेशन सुविधा
- व्हिडीओ लायब्ररी



# प्रिती संगम – विश्रामगृह



- ❖ उदघाटन दि.१३/०६/२०१८
- ❖ शुभहस्ते मा.श्री. सतिशचंद्र माथुर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई.

**वैशिष्ट्ये**

- ❖ अत्याधुनिक सुट
- ❖ प्रशस्त जागा
- ❖ मोकळी हवा
- ❖ आकर्षक फर्निचर



# साई बांगुर्डा – दत्तक ग्राम योजना

❖ आरोग्य शिबिर.





❖ पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण शिबिर.




❖ स्वच्छ भारत अभियान.

मुंबई येथे साई बांगुर्डा हे आदिवासी गाव आहे. या गावातील रहिवाशांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी मा. श्री. सोमनाथ घार्गे, प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र मरोळ, मुंबई यांनी सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने हे गाव दत्तक घेतले. या गावामध्ये पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ येथील प्रशिक्षणार्थींनी वर्षभर स्वच्छता अभियान राबवून गावातील लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. त्यामुळे गावातील रोगराई कमी होऊन आरोग्यदायी वातावरण तयार झाले.

येथील रहिवाशी यांचे करीता वेळोवेळी आरोग्य शिबिर घेऊन तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले. या गावातील युवकांसाठी पोलीस भरतीपुर्व प्रशिक्षण देण्यात आले. तसेच स्पर्धापरीक्षा संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. मैदानी खेळाला प्रोत्साहन देण्याकरिता हॉलबॉल मैदान, लांबउडी मैदान, गोळाफेक मैदान तयार करण्यात आले. त्यांच्याकरीता वाचनालय स्थापन केले. या गावातील लहान मुलांना शिक्षणाची ओढ लागावी या करीता बालवाडी सुरू करण्यात आली. तसेच लहान मुलांना पौष्टीक खाऊ वाटप सुरू केले.

# गांडुळखत प्रकल्प



- कचऱ्याचे कमी वेळेत फायदेशीर व्यवस्थापन

- गांडुळ खत निर्मितीचे प्रशिक्षण देताना अनिरुध्द अकॅडमीचे प्रशिक्षक..





- टाकाऊ कचऱ्यापासुन गांडुळ खत निर्मिती
- या प्रकल्पामुळे पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या कचरा विल्हेवाट खर्चात लक्षणीय कपात

- या प्रकल्पातुन तिमाही १८० ते १९० किलो गांडुळ खत निर्मिती



# अद्ययावत ग्रंथालय





**वैशिष्टये**

- ❖ सर्व कायदेविषयक पुस्तके
- ❖ स्पर्धा परिक्षा पुस्तके



**वैशिष्टये**

- ❖ चोवीस तास मोफत इंटरनेट सुविधा
- ❖ लायब्ररी मॅनेजमेंन्ट सॉफ्टवेअर सुविधा
- ❖ Kiosk System ची सुविधा



- ❖ प्रशिक्षणार्थी विचारमंच

# सुसज्ज भोजनालय



- ❖ प्रशस्त इमारत
- ❖ स्वच्छ भोजनगृह
- ❖ आधुनिक रोटी मेकर मशिन
- ❖ आधुनिक पिठाची गिरणी
- ❖ अचुक हिशेब व्यवस्था
- ❖ पाईप लाईनव्दारे गॅस पुरवठा सुविधा

- ❖ पौष्टीक आहार
- ❖ आहार तज्ञाचे मार्गदर्शन
- ❖ पारदर्शक व्यवस्थापन (खरेदी विक्री व्यवहार स्वत: प्रशिक्षणार्थीव्दारे)
- ❖ प्रशिक्षणार्थीकरीता टेबल खुर्ची व्यवस्था
- ❖ सी.सी.टी.व्ही.कॅमेरा





❖ 'ग्रॅंड हयात'' या पंचतारांकित हॉटेलच्या प्रमुख स्वयंपाकी यांनी प्रशिक्षण केंद्रातील स्वयंपाकी यांना प्रशिक्षण दिले.

❖ प्रशिक्षणार्थी भोजनालयाचे ऑनलाईन ॲपद्वारे मुल्यांकन नोंदवितांना.



## मॉडेल पोलीस ठाणे



- ❖ वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे दालन
- ❖ ठाणे अंमलदार कक्ष
- ❖ तडीपार कक्ष
- ❖ गुन्हे प्रकटीकरण कक्ष
- ❖ अत्यावश्यक रजिस्टर्स

- ❖ सुसज्ज दालने
- ❖ पोलीस कोठडी
- ❖ पारपत्र कक्ष
- ❖ बिनतारी संदेश यंत्रणा विभाग
- ❖ महिला कक्ष



## गुन्हे देखावा दालन



- ❖ गंभीर स्वरूपाच्या गुन्हयाचे जिवंत देखावे
- ❖ प्रत्यक्ष घटना चित्रे
- ❖ भैतिक पुरावे

- ❖ परिस्थितीजन्य पुरावे
- ❖ प्रत्यक्ष अनुभवावरून तपासास मार्गदर्शन



## औषधी वनस्पती नर्सरी




- ❖ दुर्मिळ औषधी वनस्पती
- ❖ प्रशिक्षणार्थ्यांकडुन जोपासना
- ❖ अडुळसा, डिकेमाली, रक्तरोहीडा, सर्पगंधा, शतावरी, सब्जा, इन्सुलिन, मधुमालती, बेहडा, हळद, कुडा इ. ८५ वनस्पती

## मध्यवर्ती भांडार गृह



- ❖ जीवनावश्यक वस्तु
- ❖ प्रशिक्षणास उपयुक्त कीट
- ❖ पारदर्शक खरेदी विक्री व्यवहार
- ❖ प्रशिक्षणार्थींच्या सोयीच्या वेळेप्रमाणे चालु ठेवण्यात येते.
- ❖ ना नफा ना तोटा तत्वावर मध्यवर्ती भांडार गृह व्यवस्था

# महाराष्ट्र पोलीस स्थापना दिन २०१८




❖ शालेय विद्यार्थ्यांना शस्त्रास्त्रांची माहिती देणारे शस्त्र प्रदर्शन.



❖ श्री.स्वामी समर्थ वृध्दाश्रम येथे भेट देवुन ताणतणाव मुक्ततेसाठी गीत संगीत कार्यक्रमाचे आयोजन केले.




❖ ''सायबर क्राईम अवेरनेस'' या विषयी पथनाटयाव्दारे जनजागृती केली.

महाराष्ट्र पोलीस स्मृतिदिन
दि. २१ ऑक्टोबर २०१७



❖ पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ यांच्या वतीने शहिदांना मानवंदना





**श्री. सोमनाथ घार्गे**

प्राचार्य,
पोलीस प्रशिक्षण केंद्र,
मरोळ,मुंबई

**श्री. शशिकांत पाटील**
पोलीस निरीक्षक
पोलीस प्रशिक्षण केंद्र,
मरोळ,मुंबई



## आंतरवर्ग प्रशिक्षण



व्हाईस ओव्हर प्रेझेंन्टर, पी.पी.टी. व्दारे प्रशिक्षण, मल्टीमिडीया प्रोजेक्टर, ऑडीओ सिस्टीम, कॉलर माईक



नांलदा ही सुसज्ज इमारत, अत्याधुनिक बैठक व्यवस्था, मल्टीमिडीया प्रोजेक्टर, मंथन हॉल

## बाहयवर्ग प्रशिक्षण



लाठी कवायत



शस्त्र हाताळणी



पद कवायत



समारंभ कवायत



योगा

मार्शल आर्ट





मल्लखांब

# यशस्वी कामगिरी



पोलीस निरीक्षक दिनेश गोरीवले यांना ''मास्टर ट्रेनर्स ऑफ स्टुडंट पोलीस कॅडेट प्रोग्राम'' उत्कृष्टता प्रमाणपत्र मा.श्री. राजनाथ सिंग, केंद्रीय गृह मंत्री तसेच मा.श्री.प्रकाश जावडेकर, केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री यांच्या हस्ते स्विकारताना.








मुंबई  मॅरेथॉन मध्ये द्वितीय पारितोषिक विजेता संघ




**भारत सरकारच्या महत्वकांक्षी उपक्रमांसाठी महाराष्ट्रातून निवड झालेले एकमेव प्रशिक्षण केंद्र**

**‘स्पर्श’**




## भारत सरकारच्या ‘स्पर्श’ योजनेत सहभाग

भारत सरकारने विदयुत बचतीसाठी सन २०१७ साली ‘स्पर्श’ योजना आमलात आणली ही योजना शासकीय कार्यालयांत प्रायोगिक तत्वावर राबविली गेली. महाराष्ट्र राज्यातील पाच सरकारी कार्यालयांची केंद्रीय स्तरावर या योजनेसाठी निवड झाली त्यापैकी पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ, मुंबई हे एक आहे.

‘स्पर्श’ योजनेमध्ये वापरण्यात येणारे सर्व साहित्य भारतीय बनावटीचे आहे. ‘स्पर्श’या योजने आंतर्गत पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ, मुंबई येथे १८०० LED टयुब व ८०० सिलींग फॅन बसविण्यात आले आहे. ‘स्पर्श’ योजनेआंतर्गत विज बिलामध्ये प्रचंड बचत झाली आहे. अश्या तऱ्हेने भारत सरकारच्या महत्वाकांक्षी योजनेत सहभाग घेणारे पोलीस प्रशिक्षण केंद्र हे एकमेव प्रशिक्षण केंद्र आहे. श्री. दिपक कोकाटे, समन्वयक, EESL, महाराष्ट्र राज्य यांनी हा प्रकल्प पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ येथे राबवण्यात सहकार्य केले

# विविध तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने



‘‘ लर्निग ॲबिलीटी ’’ शिकण्याची क्षमता या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. मनाली लोंढे, सौमय्या कॉलेज, मुंबई.



पोलीस प्रशिक्षणार्थींना ‘‘पोलीस आणि मानसोपचार ’’ या विषयावर डॉ. प्रज्ञा चौगुले यांचे व्याख्यान



पोलीस प्रशिक्षणार्थी यांना मा. श्री. भगवंतराव मोरे, भा.पो.से. अध्यक्ष, राज्य मानवी हक्क आयोग मुंबई यांनी मार्गदर्शन केले.



पोलीस प्रशिक्षणार्थी यांना मा. श्री. कृष्णप्रकाश, भा.पो.से. विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.




पोलीस प्रशिक्षणार्थींना फोर्सवन पथकाचे अधिकारी मार्गदर्शन करताना



पोलीस प्रशिक्षणार्थी यांना ‘‘ आपत्कालीन व्यवस्थापन ’’ या विषयावर अनिरूध्द अकॅडमी चे पथक मार्गदर्शन करताना

# विविध तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने



''पिडीतांचे पुनर्वसन'' या विषयावर श्री.प्रविण खांडपासोळे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.



श्री.संदिप कुलकर्णी यांनी ''शरीर रचना व व्यायाम'' या विषयावर मार्गदर्शन केले.



''ट्रॉफिक मॅनेजमेंट'' या विषयावर श्री.मधुकर शेंबळे, समादेशक हे मार्गदर्शन करतांना.



''जागरुक मुंबईकर'' या अभियानाअंतर्गत तज्ञांचे मार्गदर्शन.



''माईंड इलनेस'' या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ.सिमा डागा, मानसोपचार तज्ञ मार्गदर्शन करतांना.




''न्यायालयाचे न्यायाधिकरण'' या विषयावर मार्गदर्शन करतांना ॲड.श्री.उपाध्याय

# विविध मार्गदर्शनपर प्रशिक्षणाचे / उपक्रमाचे आयोजन



पोलीस प्रशिक्षणार्थी करीता यशदा यांचे वतीने“ प्रशासकीय पायाभुत प्रशिक्षण ”




पोलीस प्रशिक्षणार्थी भ्रष्टाचार विरोधी पथकाचे अधिकारी मार्गदर्शन करताना




पोलीस प्रशिक्षणार्थी यांची CRY- Child Rights and You या संस्थेस भेट



पोलीस प्रशिक्षणार्थी यांचा “ संविधान दौड ” मध्ये उत्स्फुर्त सहभाग



पोलीस प्रशिक्षणार्थी भारत सरकारचे “ स्वच्छता अभियान ” संकल्पना राबविताना

# स्वभावाचे विज्ञान

खरतर आजच्या युगामध्ये विज्ञान–तंत्रज्ञानामुळे सुखसोयींच्या प्रमाणात खूपच वाढ झाली आहे. त्यामुळे आजच्या पिढीची खूप कामे पुर्वीच्या पिढीपेक्षा खूपच सोपी झाली आहेत. आपण आजच्या सुखसोयी, विज्ञानाची तुलना जुन्या पिढीच्या सुखसोयीशी केली तर जुन्या पिढीपेक्षा आपल्या पिढीमध्ये समाधान जास्त हवे होते. पण तसे न होता उलट झाले असल्याचे लक्षात येते. याचे कारण असे की, आताच्या पिढीने जरी भौतिक प्रगती उदा. पैसे, सुखसोयी इत्यादी मध्ये खुप प्रगती केली असली तरी आताच्या पिढीने आपल्या आंतर–जीवनाच्या प्रगती कडे दुर्लक्ष केले आहे. आजच्या पिढीमध्ये आपले चारित्र्य, स्वभाव, माणुसकी यांचा दर्जा जशी पिढी पुढे–पुढे सरकत जात आहे तसा कमी कमी होत गेला असे दिसते. थोडक्यात मला असे म्हणायचे आहे की, चालू पिढीमध्ये स्वभाव, चारित्र, माणुसकी हे गुण कमी प्रमाणात पाहायला मिळतात आणि ते सुधारण्यासाठी विशेष प्रशिक्षण दिले जात नाही.

माणसामधील हे गुण सुधारायचे म्हणजे हे बघितले पाहिजे की, माणसाच्या स्वभावाचा उगम नेमका कसा होतो ? स्वभावाची निर्मिती माणसामध्ये होते कशी ? सर्व प्रथम स्वभाव तयार होण्याची पहिली पायरी म्हणजे एक पहिला विचार ज्याला आपण इच्छाशक्ती म्हणतो व त्याचे रुपांतर कालांतराने आपल्या स्वभावामध्ये होते. उदा. एखादी व्यक्ती एका बागे जवळून जात असेल तर त्याला गुलाबाचा वास येतो आणि त्याच्या मनात ते फुल तोडण्याची इच्छा होते. आता दुसऱ्या दिवशी ती व्यक्ती परत त्या बागे जवळून जाते तेव्हा गुलाबाचे फुल, त्याच्या वर पडलेले दवबिंदू त्याला आकर्षित करते. त्यामुळे तो फुल तोडण्यासाठी प्रवृत्त होतो आणि ते गुलाबाचे फुल तोडतो. त्या व्यक्तीने रोज त्या बागेजवळून जाताना तिच गोष्ट सारखी सारखी केल्यामुळे तेथून जाताना गुलाबाचे फुल तोडण्याची त्याला सवय होते.


या ठिकाणी आपणाला एक कळून येते की, एक साधा विचार सवयी मध्ये कसा रूपांतरित होतो. त्यांनतर आपल्या स्वभावामध्ये आपल्या पुर्ण आयुष्यामध्ये आपण जे काही निर्णय घेतो उदा.– आपले शैक्षणिक, व्यावसायिक निर्णय यांच्यामागे आपल्या आवडी–निवडी, आपला स्वभाव याचा प्रभाव पडतो. यानुसार जीवनातील प्रत्येक गोष्टीमागे, क्रियेमागे, विचारामध्ये आपल्या स्वभावाचे विचार लपलेले असताच असतात ! लोक म्हणतात, स्वभावाला औषध नाही. मी म्हणतो स्वभावाला औषध आहे. एखादयाला चांगले विचार, सकारात्मक विचार करण्याचे शिकविले तर त्याचा स्वभाव बदलण्याची शक्यता असते. दुसरी क्रिया करणे म्हणजे स्वभावाला लागलेले आजार उदा. व्देष, बदला घेण्याची वृत्ती, एखादया गोष्टीची अतिहाव, विनाकारण भिती, नकारात्मकता, मत्सर, स्पर्धा करणे इत्यादी. माणसामधील हे सर्व आजार माणसाला चांगला स्वभाव, चांगली युक्ती, चांगले चरित्र्य बनवू देत नाही. जर एखादया व्यक्तीने त्याच्या आयुष्यामध्ये कितीही संपत्ती कमवली आणि हे उल्लेख केलेले आजार जर त्याच्या मध्ये असतील तर तो आयुष्यामध्ये मिळवलेल्या संपत्तीचे सुख किंवा समाधान घेऊ शकत नाही. आता आपल्या मनामध्ये मुख्य प्रश्न हा पडला असेल की, हे आजार बरे होवू शकतात काय ? तर हो, बरे होवू शकतात. हे सर्व आजार घालविण्यासाठी एकच प्रक्रिया आहे ती म्हणजे, आपल्या मनाचे शुध्दीकरण आणि हे शुध्दीकरण आध्यात्मामध्ये नक्की मिळू शकते.

थोडक्यात मला या लेखामधून हे सांगायचे आहे की, तुमचे शिक्षण तुम्हाला मोठया पगाराच्या हुददयावर पोहचवू शकते पण त्या हुददयावरती सशक्त मनाने समाज उपयोगी चांगले काम करण्यासाठी, त्या हुददयावर काम करता करता तेथील सुख उपभोगण्यासाठी, तुमचा स्वभाव कसा आहे ? या प्रश्नाचे उत्तर फार महत्वाचे आहे. चला, पहा तर मग थोडे आत्मचिंतन करून, खरच माझा स्वभाव कसा आहे ?

**नाव** :– **सौरभ उत्तम कोळी**

**भरती जिल्हा** :– **कोल्हापुर**

**चेस्ट क्र.** :– ५२४



## शेवटी खाकीचं

हसण्याआधी रडलो आपण
मरण्याआधी जगलो आपण

खाकी मधुनी जग बघताना
एकमेकांना कळलो आपण

उरण्यासाठी? पुरण्यासाठी?
कशासाठी बनलो आपण?

घेण्याची ना ईच्छा आपली
सेवा देण्यासाठी जमलो आपण

आहे? नाही, नाही? आहे...
मागे रिकामे उरलो आपण

हे विश्वासाचे जग नाही
त्याची मोहर ठरलो आपण

**नाव : उत्कर्ष अचलेरकर**
**जिल्हा : उस्मानाबाद**
**चेस्ट क्र : १२८**

## आठवणी

जुन्या वहीची पाने चाळताना
मोरपीस हातात पडत
मोरपीस गालावर फिरताना
आठवनींशी नातं जडतं

या आठवणीत बुडुन जाताना
आजच नाही उरत भान
क्षण ते परत ना येतील आता
तीच होती सुखाची खाण

आठवणी असतात अनेकांच्या
तुमच्या, माझ्या ,सर्वांच्या
प्रत्येकाची असते एक तरी आठवण
दु:खाची अथवा सुखाची साठवण

माझ्याकडेही आहेत अशाच आठवणी
पालटुन गेलेल्या भुतकाळाच्या
जिवंत झाल्या त्याच आठवणी
सुवर्ण रुपी गतकाळाच्या

हृदयात त्या रुजुनी गेल्या
काही त्यातल्या बुजूनी गेल्या
मनात काहींनी घर केले
पण क्षण आता ते उडुन गेले

आठवणी आठवाव्या लागत नसतात
आपोआप त्या आठवत असतात
पालटुन गेलेल्या सुंदर जीवनाचे
सुंदर क्षण भेटीस पाठवत असतात.

**नाव :— मनोज नारायणराव घोटेकार**
**जिल्हा:— नागपुर शहर**
**चेस्ट क्र : ४९४**

## आई

जगण्याच्या धडपडीत घर सुटतं पण.....
आठवणी कधीच सुटत नाहीत
आयुष्यातले आई नावाचे पान
काहीही झाले तरी कधीच मिटत नाही

तळ हाताचा पाळणा  करुन सांभाळते ती आपल्याला
आपल्या आयुष्यात आनंदाचा फुलवते नेहमीच ती मळा
आपण जरी विसरलो तरी माया तिची कधी घटत नाही
आयुष्यातले आई नावाचे पान
काहीही झाले तरी कधीच मिटत नाही

तिच्या अखेरच्या श्वासापर्यंत तिला आपलाच लळा असतो
आपलं भलं व्हावं हयातच तिच्या जगण्याचा सोहळा असतो
तिच्या पंखाखाली मन निवांत असते,
चिंता कधी वाटत नाही
आयुष्यातले आई नावाचे पान
काहीही झाले तरी कधीच मिटत नाही

**नाव:– विनोद दिलिप नायगमकर**
**जिल्हा :– नागपुर  ाहर**
**चेस्ट क्र :– ४१२ पथक :– १६**

## पोलीस

आपल्या गावापासून अलिप्त असतात पोलीस
आठवण आली की कासावीस होतात पोलीस

गाव दूर, अन पत्नीच्या पोटात अंकूर
कर्तव्याला तरीही श्रेष्ठ मानतात पोलीस

बाहेर दिवाळी, अन आत शरीराची होळी
चौकातच सण साजरा करतात पोलीस
भुकंप, प्रलयात धावुन येतात पोलीस
ढिगाखालचं बाळ पाहुन रडतात पोलीस

रात्र रात्र समाज रक्षणासाठी जगतात पोलीस
प्राणप्रिय देशासाठी पुढे सरसावतात पोलीस

जरी दिसतात चेहऱ्यावरुन करडे अन फरडे
हृदयात मात्र हळवी फुले जपतात पोलीस

गैरसमजुती पुसा, जरासे जवळ या,
तुमच्या सारखीच माणसं असतात पोलीस

**नाव : सुजित पंडित देवरे**
**जिल्हा : धुळे**
**चेस्ट क्र : ५२८**



## गॉव

तेरी बुराइयों को हर अखबार कहता है
और तु मेरे गांव को गवार कहता है

ऐ शहर मुझे तेरी औकात पता है
तु चुल्लूभर पानी को भी वॉटर पार्क कहता है

थक गया है हर शख्स काम करते करते
तु इसे अमिरी का बाजार कहता है

जिनकी सेवा में खपा देते थे जीवन सारा
तु उन मॉ बाप को अब भार कहता है

बैठ जाते थे अपने पराये सब बैलगाडी में
पुरा परिवार भी न बैठ पाये उसे तु कार कहता है

अब बच्चे भी बडो का अदब भुल बैठे है
तु इस नये दौर को संस्कार कहता है.

**नाव : महेश राजेंद्र कदम**
**जिल्हा : उस्मानाबाद**
**चेस्ट क्र : १२६**



## वाट संघर्षाची

बागडलो, हसलो, खेळलो
बालपणीच्या जगात
तरुणाई आली माझी
रणरणत्या उन्हात

संघर्षाची वाट सुरु
झाली माझ्या बयाला
अविरत प्रयत्न झाले
परंतु स्पर्श नाही यशाला

खचुन गेलो, थकुन गेलो,
क्षितिजा पल्याड पळुन गेलो
रुजुन गेलो, थिजुन गेलो,
दगडाप्रमाणे झिजुन गेलो

प्रयत्नाची अथक लढाई
झाली अशी खरी,
नोकरीरुपी यश मिळाले
येऊन माझ्या दारी

**नाव : विशाल सुधाकरराव गुढे**
**जिल्हा : नागपुर शहर**
**चेस्ट क्र : ३०७**



## “ माय – बाप ”

ऐका ऐका दोस्तानो माय बापाची कहाणी
ऐका ऐका दोस्तानो माय बापाची कहाणी
बाप नारळी खोबरं.................
माय नारळाचं पाणी, माय नारळाचं पाणी

बाप कष्ट करी माझा, करी रान हिरवंगार
माय हरिण काळीज ,पिका जपतीया फार
बाप शिवाराचा धनी, माय धन्याची हो राणी
बाप नारळी खोबरं, माय नारळाचं पाणी

ऐका माय बापामध्ये, पैज अशी हो लागली
सांग कोणावाणी पोर, हाय कोणाची सावली
तवा हसुन माय म्हणे, थोडा –थोडा दोघावाणी
बाप नारळी खोबरं, माय नारळाचं पाणी

जीव लावतीया माय, मन मायेच निराळं
बाप लपवितो डोळा, जवा येतोया वघाळं
ओला मायेचा पदर, पुसुन डोळयातलं पाणी
बाप नारळी खोबरं, माय नारळाचं पाणी

**नाव :– विठ्ठल नाना शेळके**
**जिल्हा :– कोल्हापुर**
**चेस्ट क्र :– २५९**

## “ मास्तर म्हणजे ”

मास्तर म्हणजे......
चांगले संस्कार करणारी मुर्ती
संकटकाळात धीर देणारी स्फुर्ती
चारित्रपुर्ण विदयार्थी घडवणारा
शिल्पकार जादुची छडी, जी करते
विदयार्थ्यांची स्वप्ने साकार

मास्तर म्हणजे......
ज्ञानाची जणु एक साखळी
एखादी कडी भरलेली
तर एखादी कडी मोकळी
कधी बिकट परिस्थितीत प्रेमाची
साथ तर कधी पाठीवरील
शाब्बासकीचा हात.
मास्तर म्हणजे......
सखोल मुलभुत ज्ञानाचे भांडार
दुर करी जीवनातील अज्ञानमय अंधार
अन्यायाविरूध्द आवाज उठवणारी तलवार
अनुभवातून निमार्ण होणारा साक्षात्कार
असे हे मास्तरांचे,
आजन्म न फिटणारे उपकार.....

**नाव :– ललित प्र. रेहपाडे**
**भरती जिल्हा :– गोंदिया**
**चेस्ट क्र :– ५२०**

# व्हर्च्युअल क्लासरूम प्रकल्प

महाराष्ट्र पोलीस दलाची गणना अत्यंत नावाजलेले पोलीस दल म्हणुन केली जाते. अशा या गौरवशाली परंपरा असलेल्या महाराष्ट्र पोलीस दलाच्या प्रशिक्षण केंद्रातील नवप्रविष्ठ पोलीस प्रशिक्षणार्थींना अदययावत व आधुनिक ई–लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या उद्देशाने आणि काळाच्या ओघाप्रमाणे प्रशिक्षणाचा दर्जा उंचावणेकरीता मा. श्री. के. व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, नागपुर शहर व तत्कालीन अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांच्या दुरदृष्टीतुन या प्रकल्पाची बिजे रूजली गेली. इतकेच नाही तर व्हर्च्युअल क्लासरूम प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामकाजाला सुरूवात केली.

त्यानंतर तत्कालीन मा. श्री. एस.जगन्नाथन् अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मा. श्री. सोमनाथ घार्गे, समन्वयक, व्हर्च्युअल क्लारूम प्रकल्प तथा प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ यांच्या अथक प्रयत्नाने हा प्रकल्प पुर्णत्वास आला.

दि. १३/०४/२०१८ रोजी मा. श्री. सतीश माथुर पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या शुभ हस्ते व्हर्च्युअल क्लासरूम प्रकल्पाचा उदघाटन सोहळा संपन्न झाला.

व्हर्च्युअल क्लासरूम प्रकल्पाची वैशिष्टे :–

१. महाराष्ट्र पोलीस दल हे व्हर्च्युअल क्लासरूम प्रकल्प उभारणारे भारतातील प्रथम पोलीस दल आहे.

२. या प्रकल्पाव्दारे मुंबई, नागपुर, नाशिक, येथे अत्याधुनिक, ॲकोस्टीक व साऊंडप्रुफ स्टुडिओ उभारण्यात आले आहेत.

३. या प्रकल्पाच्या ई – स्टुडिओमधुन एकाच वेळी महाराष्ट्र पोलीस अकॅडमी नाशिक, गुन्हे अन्वेषण विदयालय नाशिक तसेच महाराष्ट्रातील सर्व पोलीस प्रशिक्षण केंद्रामधील एकुण २२५ क्लासरूममध्ये तज्ञांचे व्याख्यान प्रक्षेपित करता येते.

४. सर्व व्हर्च्युअल क्लासरूममध्ये टु वे कम्युनिकेशनची सुविधा असल्याने नवप्रविष्ठ पोलीस प्रशिक्षणार्थींना आपली शंका किंवा प्रश्न तज्ञ व्याख्यात्यांना विचारून चर्चा करता येते. या आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने व्याख्याते व प्रशिक्षणार्थी यांच्यातील शेकडो किलोमीटर अंतर नाहिसे होऊन प्रत्यक्ष वर्गातच व्याख्यान सुरू असल्याचे आभासित होते. प्रत्यक्ष क्लासरूममधील ज्ञानदानाप्रमाणेच प्रशिक्षण देणे शक्य होते.

५. नामवंत व्याख्यात्यांचे अमुल्य ज्ञान सर्व पोलीस प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थीपर्यंत पोहचविणे या प्रकल्पाच्या माध्यमाने सहज शक्य झाले आहे. व्याख्यान रेकॉर्डींगची सुविधा असल्याने हे अमुल्य ज्ञान कायम स्वरूपी साठविण्याकरिता व्हिडीओ लायब्ररी निर्माण करण्यात आली आहे. व्हिडीओ लायब्ररीचा वापर करून प्रशिक्षणर्थीना निरंतर प्रशिक्षण देणे शक्य झाले आहे.

६. या प्रकल्पामध्ये उच्च दर्जाच्या संगणकीय साधनांचा वापर करण्यात आला आहे. महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे 64 TB एवढी उच्च साठवणुक क्षमता असलेला मास्टर सर्वर बसविण्यात आला आहे.तसेच पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रत्येकी 02 TB क्षमतेचे स्लेव सर्वर स्थापित करून इंटरनेटव्दारे जोडण्यात आले आहेत.

७. सर्व पोलीस प्रशिक्षण केंद्र ऑप्टीकल फायबर इंटरनेट लिज लाईन या उच्च दर्जाच्या नेटसुविधेव्दारे जोडण्यात आलेले आहेत.त्यामुळे सर्व पोलीस प्रशिक्षण केंद्रांना संगणकीय तंत्रज्ञान व इंटरनेट या अत्याधुनिक ज्ञानाच्या महाजालाचा वापर करण्याकरीता एक मंच तयार झाला. या मंचाचा वापर करून इतरही ई–लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर करणे पोलीस प्रशिक्षण केंद्र यांना सहज सोपे झाले आहे.

हा व्हर्च्युअल क्लासरूम प्रकल्प पुर्णत्वास नेण्याकरीता पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ या संस्थेने अग्रणी राहुन समन्वयाचे कार्य अतिशय उत्कृष्टरित्या केले आहे. त्यामुळेच महाराष्ट्र पोलीस प्रशिक्षणाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरणारा हा नाविन्यपुर्ण प्रकल्प साकार झाला. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

जय हिंद......

**शैलेंद्र हिलालसिंग पाटील**
टिम लिडर, व्हर्च्युअल क्लासरूम प्रकल्प
तथा स.पो.निरीक्षक, पोलस प्रशिक्षण केंद्र,मरोळ

# सायबर गुन्ह्यांच्या संदर्भातील दक्षता

**सध्याच्या आधुनिक युगात पारंपारिक गुन्हयांपेक्षा बौध्दिक संपदेचा वापर करुन केल्या जाणाऱ्या म्हणजेच सायबर गुन्हयांमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. त्याच अनुषंगाने विविध सायबर गुन्हयानां आळा बसण्यासाठी घ्यावयाची खबरदारी व गुन्हयांबाबतची माहिती.**

**१.फिशिंग –फिशिंग दोनप्रकारे करण्यात येते.**

अ) पहिल्या प्रकारात एखाद्या अज्ञात मेल आयडीवरून तुम्हाला लॉटरीचे बक्षीस लागले आहे, अशा मजकुराचा मेल येतो.बक्षिसाची रक्कम घेण्यासाठी बँक खाते, एटीएम, एटीएम पिन, पॅन कार्ड अशी महत्त्वपूर्ण माहिती मागण्यात येते. नायजेरियन व्यक्ती या प्रकारात मोठ्य प्रमाणात गुंतलेल्या असल्याने या प्रकाराला नायजेरियन फ्रॉड' असेही म्हटले जाते.

(ब) दुसऱ्या प्रकारात बँकेची खोटी वेबसाइट तयार करून तुम्हाला फसविण्यात येते.अशा खोट्या वेबसाइटच्या लिंकमध्ये https च्या ऐवजी http असे असते. पण केवळ S नसलेल्या या वेबसाइटकडे घाई–घाईत क्लिक करून माहिती दिली जाते आणि पैसे गमावण्याची वेळ येते.

**२.वॉशिंग** –व्हॉइस ओव्हर इंटरनेट प्रोटोकॉलने (VOIP) ही फसवणूक केली जाते. यात लक्ष्य असलेल्या व्यक्तीला फोन येतो. यात रेकॉर्ड केलेल्या मेसेजसारखा भासणाऱ्या आवाजात तुमच्या अकाऊंटमध्ये काही गैरप्रकार सुरू असल्याचे सांगण्यात येते. तुमचे एटीएम कार्ड ब्लॉक करण्याची विनंती करण्यात येते, त्यासाठी एटीएम पिन मागण्यात येतो किंवा तुमच्या कार्डविषयी असलेली अपूर्ण माहिती घेऊन त्या माध्यमातून पैसे काढण्यात येतात.

**३.मोबाइल फ्रॉड** –बँकेचे ॲप मोबाइलवर डाऊनलोड करून त्याआधारे बँकिंग करण्याची पद्धत रूढ होत आहे. परंतु कंपनीचे बनावट ॲप तयार करून त्याआधारे माहिती मिळवण्याचे प्रकारही वाढीस लागले आहेत बँकेचे बनावट ॲप, सॉफ्टवेअर डेव्हलपर तयार करतात त्या माध्यमातून बँकेविषयी तसेच तुमची महत्त्वपूर्ण माहिती मिळवून पैसे काढून घेण्यात येतात. विशेष म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचेही बनावट ॲप तयार करण्यात आले आहे.

**४.मालवेअर** – या दुकानांमध्ये कार्डाविषयी माहिती साठवलेल्या सिस्टीममध्ये सॉफ्टवेअरच्या साहाय्याने घुसखोरी करण्यात येते. हे सॉफ्टवेअर साठवलेली माहिती मिळवते. या माहितीचा वापर ई–ट्रान्झॅक्शन करण्यासाठी किंवा बनावट कार्ड तयार करून खरेदी करण्यात येते.

**५.बटणांना गोंद लावणे** – एटीएम मशीनच्या बटणांना खळ, गम किंवा सोल्युशन लावून ती बटणे काम करणार नाहीत याची काळजी घेतली जाते. एखादी व्यक्ती पैसे काढण्यासाठी आल्यानंतर त्याचे एटीएम कार्ड मशिनमध्ये टाकल्यानंतर बटण दाबताना ती दाबली जात नाहीत. अशावेळी भामटे तुमच्याजवळ येऊन तुम्ही कोणती बटणे दाबताय हे पाहतात. तुम्हाला मदत करण्याचा किंवा तुमची समस्या ऐकण्याचा बहाणा करत पिन नंबर जाणून घेतला जातो. तसेच तुमचे कार्ड अडकून असल्यास तुम्ही गेल्यानंतर पिन नंबर वापरून पैसे काढून घेतले जातात.

**६.स्किमर –ए**टीएम मशिन किंवा कार्डद्वारे पैसे अदा करण्याच्या ठिकाणी मशिनना स्कीमर लावण्यात येतात.हे स्कीमर जिथे कार्ड स्वाइप करण्यात येते, त्याच ठिकाणी अशाप्रकारे लावण्यात येते की तो एटीएम मशिनचाच एक भाग असल्यासारखे दिसते. जेव्हा तुम्ही मशिनमध्ये कार्ड टाकता किंवा स्वाइप करता त्यावेळी हा स्किमर तुमच्या कार्डमधील माहिती मिळवते.

**७.मॅन–इन–दी–मिडल** – सार्वजनिक ठिकाणी वायफाय क्षेत्रात दुसऱ्याच्या मोबाइलमध्ये घुसखोरी करून माहिती मिळवण्याचा प्रकार म्हणजे मॅन–इन–दी–मिडल. यात हॅकर विविध सॉफ्टवेअरचा वापर करत तुमच्या मोबाइलचा डेटा पाहतो. मोबाइल बँकिंग किंवा इतर काही माहिती असल्यास ती काढून घेतली जाते.

**८.पिन कोड कव्हर करा** – पॉइंट ऑफ सेल किंवा दुकानात पैसे देण्याच्या काऊंटरवर कार्ड वापरून पेमेंट करण्याची वेळ आल्यास कार्डाचा पिन टाइप करताना काळजी घ्या, विक्रेत्याला कधीही पिन देऊ नका. त्याचप्रमाणे तुमच्या कार्डावर कुठेही पिन लिहून ठेवू नका किंवा कार्ड ठेवत असलेल्या कव्हरमध्ये पिन लिहून ठेऊ नका.

**९.मोबाइल क्रमांक नोंदवा** – अशाप्रकारचे फ्रॉड हे कधीही एकट्या–दुकट्या व्यक्तीसोबत होत नाहीत. ग्राहकांच्या क्रेडिट अथवा डेबिट कार्डाची माहिती साठवून ठेवणाऱ्या रिटेल दुकानांमध्ये असे प्रकार घडतात. तुम्ही तुमच्या खात्यात करत असलेल्या कोणत्याही व्यवहारांचा ॲलर्ट बँकेकडून मागा. त्यासाठी तुमचा मोबाइल क्रमांक तुमच्या बँकेकडे नोंदवा.

**१०.नियमित खाते तपासा** –खात्यात एखादा गैरव्यवहार झाल्यास त्याची माहिती बऱ्याच दिवसांनंतर बँकेला ग्राहकाकडून दिली जाते. याचे कारण खात्याचे स्टेटमेंट पाहिल्यावरच त्यांच्या ही बाब लक्षात येते. यासाठी ई–बँकिंगसारख्या सुविधा उपलब्ध असल्याने तुमचे बँक खाते नियमितपणे तपासा.

**११.बँक तपशील गुप्त ठेवा** – माहिती दिल्याशिवाय तुम्हाला बक्षीस मिळणार नाही, असे कुणी सांगितले, तरीही त्या व्यक्तीला तुमच्या बँक खात्याचा तपशील कधीही देऊ नका. तुमच्या ईमेलवर एखादा मोबाइल नंबर आल्यास त्यावर कधीही कॉल करू नका.

**१२.एटीएमजवळ अनोळखी नको** – बऱ्याच एटीएम केंद्रांत बहिर्गोल आरसा असतो. त्याचा वापर करून तुम्ही एटीएमच्या साह्याने व्यवहार करताना कोणी पहात नाही ना याची खात्री करा.

**१३.फसवे ई – मेलपासून सावध राहा** – तुमच्या बँक खात्याची माहिती अद्ययावत करा, असे सांगणारे ई–मेल तुम्हाला आले असतील, तर अशी कोणतीही माहिती त्यावर देऊ नका. असा ई–मेल हा फिशिंग मेल असू शकतो. याचा परिणाम ओळख चोरीत (आयडेंटिटी थेफ्ट) होऊ शकतो.

**१४.लिंकवर क्लिक करू नका** – तुमच्या ई – मेलवर आलेल्या कोणत्याही लिंकवर क्लिक करू नका. अशी लिंक बँकेकडून आलेली असली तरीही लगेच क्लिक न करता त्याचा यूआरएल लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करा. मग हा यूआरएल नव्याने ॲड्रेस बारमध्ये टाइप करा आणि मगच पुढील व्यवहार करा.



**ज्ञानदीप पाटील**
संगणक व सायबर तज्ञ
सहज संपर्क : ७९७७६८५२१९
व्हॉटस ॲप संपर्क : ९८९२९८४७४४
ई–मेल deepsoft001@gmail.com
Blog-http:// dyandeep001.blogspot.in/

# आमचा सांस्कृतिक हॉल

संगीत संस्कृतीचे महत्व सांगताना जगत गुरू तुकोबाराय असे म्हणतात की,

गायनाचे उंडी आपुलीया छंदे! मनाचे आनंदे आवडीणे !!
लावुनी मृदंग श्रुती टाळघोषा सेवू ब्रम्हरस आवडीणे !!

संगीतातील हे सामर्थ्य मरोळ पोलीस प्रशिक्षण केंद्राचे मा. प्राचार्य साहेबांनी अचुक हेरले. मा. प्राचार्य सरांच्या अंगभुत कलागुणानुसार त्यांनी हे संगीत सामर्थ्याचे ज्ञान प्रशिक्षणर्थ्यांना देण्यासाठी प्रयत्न सुरू केला. पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ तसे संपुर्ण सुविधांनी युक्त ! मात्र त्याला अपवाद तो स्वतंत्र संगीत हॉलचा ! मा. प्राचार्य सरांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थ्यासाठी स्वतंत्र संगीत दालनासाठी एका रिकाम्या हॉलची निश्चिती करण्यात आली. त्यानंतर प्रशिक्षणर्थ्यांमधून संगीताची जाण असणाऱ्या कलाकारांची एक सांस्कृतिक टीम तयार करण्यात आली. सर्व वादयांची जमवाजमव झाली परंतु जो हॉल निवडला तो सुस्थितीत नव्हता.

सर्व प्रथम प्रशिक्षणार्थ्यांच्या श्रमदानातुन त्या हॉलची डागडुजी केली गेली. खोलीत विजेच्या सुविधेत बदल करण्यात आला. जे प्रशिक्षणार्थी भिंतीला रंगरंगोटी करण्यात पटाईत होते त्यांच्या कडुन खोलीला रंग देण्यात आला. आता खोली छान दिसु लागली तिथे मन रमू लागले पण तेवढयावर न थांबता प्रशिक्षणार्थ्यांनी खोलीच्या भिंतीवर साक्षात नटराज यांचे सुबक चित्र रेखाटले. त्या बरोबरच भिंतीवर तबला, पखवाज, विणा, हारमोनियम, तंबोरा या सारखी अतिशय सुबक चित्रे रेखाटली. सर्व चित्रे एवढी सुबक रेखाटली की, त्यांचे वास्तव्य तिथे असल्याची अनुभुती मिळू लागली. आता हॉल परिपुर्ण झाला. खोलीला आता सुसज्य बैठक व्यवस्था, वादयासाठी ठेवण्याची सुरक्षित जागा, म्युझिक सिस्टीम, लाईटस या सर्व सुविधा एकाच छताखाली आल्या.

आता प्रशिक्षणार्थी या सांस्कृतिक व संगीत दालनात जाऊन नियमित सराव करू लागला. सर्व कलाकार आपआपल्या कला प्रकारात कुशल होऊ लागले. मा. प्राचार्य सरांनी या कलाकारांना पहिली संधी उपलब्ध करून दिली ती म्हणजे २०१८ या नववर्ष स्वागत कार्यक्रमाची ! तो पर्यंत आम्हा प्रशिक्षणार्थ्यांचे पी.टी.सी. मधील तीन महिने पुर्ण झाले होते. घरापासुन या आधी ऐवढे दिवस दुर राहीलो नव्हतो. त्यामुळे गावची खूप आठवण येत होती. पण आमच्या या नवख्या प्रशिक्षणार्थी कलाकारांनी तो कार्यक्रम इतका उत्कृष्ठ सादर केला की, आम्ही सर्व प्रशिक्षणार्थी अगदी कंम्प्युटर रिस्टार्ट केल्याप्रमाणे रिफ्रेश झालो. कार्यक्रम खुपच कौतुकास्पद व यशस्वी पार पडला.

आता प्रशिक्षणार्थी कलाकार मंडळी थांबायला तयारच नव्हती. त्यांनी अधिक मेहनत घेतली. पोलीस स्थापना दिनानिमित्ताने या संगीत टिमने पथनाटयाच्या माध्यमातुन सायबर क्राईम संदर्भात मुंबईच्या विविध भागात जनजागृती केली. वेगवेगळया कारणांनी गुन्हेगारी क्षेत्रात वळलेल्या बालकांना बालसुधारगृहात ठेवले जाते. अशा बालसुधारगृहांना भेट देऊन तेथील बालकांच्या बाल मनावर या टिमने राष्ट्रीय गाणी, प्रेरणा गीत गावून व नाटकांच्या माध्यमातून देशप्रेमाची, राष्ट्रीय भावना जागृत केली. तसेच नैराश्येच्या खाईत गेलेले व कुटुंबापासुन वंचित अशा वयोवृध्द हतबल व्यक्तींचे राहण्याचे सामुहीक ठिकाण म्हणजे वृध्दाश्रम! अशा वृध्दाश्रमास या संगीत टिमने भेटी देउन तेथील वृध्दांच्या चेहऱ्यावर आनंद, हसु उमटवले. भक्ती गीतांच्या माध्यमातुन त्यांच्या चेहऱ्यावर आनंद हसु उमटवले. त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाची झलक दिसली. त्यांना विश्वास दिला की, तुम्ही एकटे नाहीत. अशा संगीतमय कार्यक्रमातून जनजागृती उपक्रम या टिमने यशस्वीपणे राबविले.

मा.प्राचार्य सरांच्या प्रयत्नांमुळे व प्रशिक्षणार्थ्यांच्या श्रमदानातुन आज मरोळ पोलीस प्रशिक्षण केंद्रातील कलाकारांसाठी हक्काचं कायमचं स्वतंत्र संगीत दालन, वृध्दांच्या चेहऱ्यावरील समाधान, बालसुधारगृहातील बालकांच्या निरागस चेहऱ्यावरील हास्य हेच आमचे यश !

आता हा सांस्कृतिक हॉल इथुन पुढे येणाऱ्या नवप्रविष्ठ पोलीस प्रशिक्षणार्थ्यांकरीता नक्कीच उपयोगी पडेल.

**नाव :– ज्ञानेश्वर पोकळे**
**भरती जिल्हा :– बीड**
**चेस्ट क्र :– १८२**

## “ गडकोटांकडे येऊन जा....”

वसा छत्रपतींचा एकदा मनामध्ये घेऊन जा !!
ऐकण्यास सामर्थ्याची कथा, या गडकोटांकडे येऊन जा !!
महाराष्ट्राच्या मातीत आली गनिमांची भर्ती
झिजवुन स्वत:ला यांनी राखली स्वराज्याची किर्ती
दोन शब्द तुमचे आज यांच्याशीही बोलुन जा!!
ऐकण्यास सामर्थ्याची कथा, या गडकोटांकडे येऊन जा !!

आपल्यासाठी एक एक भिंत, राष्ट्राची अब्रु राखुन गेली
आज मात्र तीच कचऱ्याच्या ढीगामध्ये झाकुन गेली
३५० वर्षापुर्वी हिच्या छातीवर कोरले पराक्रमाचे ठसे
आज हिच्या भिंतीवर लिहीले जातात आर्चीच्या प्रेमाचे किस्से
या नि ठेच्या निशाणावर आज डोके तुमचे ठेऊन जा !!
ऐकण्यास सामर्थ्याची कथा, या गडकोटांकडे येऊन जा !!

दिला जीव तानाजी, बाजींनी या बुरूजांचा मान राखण्यासाठी
लाखो जण मातीत गेले, स्वातंत्र्याची गोडी चाखण्यसाठी
शिवबांच्या सामर्थ्याने नटलेली भिंत हिच्या भक्कमतेला सल नाही
तोडु शकेल हिचे सामर्थ्य इतके कोणत्याही शत्रुमध्ये बळ नाही
जिच्यावर पडले शिवरायांचे पाऊल ती माती कपाळाला लावुन जा !!
ऐकण्यास सामर्थ्याची गाथा, या गडकोटांकडे येऊन जा !!

उभा राहिल्या या भिंती गनिमांना खाली झुकवण्यासाठी
पण आम्ही आज वापरतो यांना दारूच्या बाटल्या लपवण्यासाठी !!
आणि जर असेच संस्कार आजच्या पिढीवरती घडत असतील
तर राजे सुध्दा वरून आज ढसाढसा रडत असतील
पण कधीच नाही तुटणार यांची आणि सहयाद्रीची नाती
आपण मिळुन सजवू पुन्हा किल्ल्यांच्या या भिंती
राखण्यास महाराष्ट्राची ही अस्मिता आज तुझाही हात लावुन जा
ऐकण्यास सामर्थ्याची गाथा, या गडकोटांकडे येऊन जा !!
या गडकोटांकडे येऊन जा !!



**नाव :– अक्षय उंदरे**
**भरती जिल्हा :– बीड**
**चेस नं :– ३०**

# ती रात्र २६/११ ची......

खुप ऐकुनी झाल्या, तू आता ऐक कविता मातीची ॥
काळीज चिरणारे घाव सोसणाऱ्या माझ्या मुंबईच्या छातीची ॥
बोटीतल्या एका नावीकाला नियतीने असा छळला होता ॥
बगलेतला समुद्र दुश्मनाला घेऊन मुंबईकडे वळला होता ॥

झोपलेल्या किनाऱ्याचीही नजर होती समुद्राच्या भरतीवर ॥
भेदण्यास या भारताला गनिम आला मुंबईच्या धरतीवर ॥
पाहावयाची होती त्यांना रक्ताळलेली मुंबई कशी दिसते ॥
पण दिसली त्यांना ती जशी चवताळलेली वाघीण असते ॥

वाटतं खरच पाकिस्तानने ओळख स्वत:ची दाखवुन दिली ॥
पाणी पाजणाऱ्यालाच मारुन औकात आपली दाखवुन दिली ॥
भारतमातेच्या अब्रुवर हात पडल्यावर प्रश्नच येतो कुठं जातीचा ॥
मग जिवाचीही पर्वा करत नाही करकरेसारखा पुत्र इथल्या मातीचा ॥

अरे लढ........ उघडया मैदानात अशा भ्याड हल्ल्यात काही मौज नाही ॥
हात फिरवुन पाठीत सुरा खुपसणारी भारत मातेची फौज नाही ॥
आर्थिक राजधानीच निवडली आमची या चुकीला आता क्षमा नव्हती ॥
कामटे धारातीर्थी पडले पण जीवनाची कसलीच तमा नव्हती ॥

लाखो रुपये घेतले कसाबाने या मुंबईत येऊन झटण्यासाठी ॥
दमडीही नाही लागली साळसकर व उन्नीकृष्णनांना जीव लुटण्यासाठी ॥
लहान लेकरही मरताना पाहून २६/११ ची रात्र ढसाढसा रडली ॥
कसली औकात तुमची, कामा हॉस्पीटलची ती नर्स तुम्हाला भारी पडली ॥

मृत्युला सामोरे जाताना हसत उर आला त्यांचा भरुन ॥
घेतला त्यांनी कसाबला कवळयात आपल्या जीवंत धरुन ॥
वाघाच्या त्या छातीवर बंदुकीच्या गोळयांचाही बिमोड झाला ॥
ओंबळे साहेबांच्या रुपाने त्याचा मृत्युच त्याच्या समोर आला ॥

कसाबरुपी विषाचा प्याला त्याने हसत हसत पिलाय ॥
मातीसाठी मरणारा तो इथुनच ट्रेनिंग घेऊन गेलाय ॥
आज ९ वर्षानंतरही या धरतीला आस लागलीये तुझा चाहुलाची ॥
धन्य झालो मी इथल्या मातीत येऊन, जिथ धुळ पडली तुझ्या पावलाची ॥



पवार, भोसले, चित्ते, चौधरी, सगळेच मरणाला फसवुन गेले ॥
लटकावुन गनिमाला फासावर भारतमातेला हसवून गेले ॥
असता कसाब जिवंत तर एवढाच फरक पडला असता ॥
ऐकुन माझ्या वीरांची गाथा तोही ढसाढसा रडला असता ॥
नाही लायकी माझी लिहीण्यास या वीरांचे बलिदान
माझ्या कवितेसाठी देवा करायचे असेल काही वरदान
एकच मागणे आहे माझे तुला साधेसुधे
परत घाल ही पोरं भारतमातेच्या झोळीमध्ये ॥


**नाव : अक्षय सुनिल उंदरे**
**भरती जिल्हा : बीड**
**चेस्ट क्र. : ३०**

# कवी मनाचे पोलीस – पुस्तक प्रकाशन



**"चला गाठू या लक्ष्य"**

कवी – पो. उप नि. चेतन लोखंडे



**"खाकी वर्दीतील दर्दी कवी"**

कवी – पो. हवा. अजय चव्हाण



आंतरवर्ग अधिकारी

बाहयवर्ग अधिकारी





कवायत शिक्षक

# मंत्रालयीन व इतर कर्मचारी



मंत्रालयीन कर्मचारी



मोटार परिवहन विभाग कर्मचारी



भोजनालयीन कर्मचारी



चतुर्थश्रेणी कर्मचारी

# प्रशिक्षणार्थींचे पथकनिहाय छायाचित्रे









# प्रशिक्षणार्थींचे पथकनिहाय छायाचित्रे









# प्रशिक्षणार्थींचे पथकनिहाय छायाचित्रे









# प्रशिक्षणार्थींचे पथकनिहाय छायाचित्रे









# प्रशिक्षणार्थींचे पथकनिहाय छायाचित्रे










# प्रशिक्षणार्थींचे पथकनिहाय छायाचित्रे









# प्रशिक्षणार्थींचे पथकनिहाय छायाचित्रे









## प्रशिक्षणार्थींचे पथकनिहाय छायाचित्रे









## सन २०१७ – १८ आमचे सेवानिवृत्त सहकारी



**श्री. पिरताजी बाबुराव तुपे**
(पोलीस निरीक्षक)



**श्री. संभाजी हनुमंतराव देशमुख**
(पोलीस निरीक्षक)



**श्री. महेश्वर महादु गावीत**
( सहा.पोलीस निरीक्षक)



**श्री. अनंत अर्जुन मोरे**
(राखिव पोलीस निरीक्षक)



**श्री. शहाजी भाऊराव उगले**
(राखिव पोलीस निरीक्षक)



**श्री. प्रदिप शंकरराव जगताप**
(पोलीस निरीक्षक)




**श्री. रोहीदास बाळु हांडे**
(रा.पो.उप.निरीक्षक)





**श्री. सदानंद दत्तात्रय निर्गुण**
(सहा.पोलीस निरीक्षक)



श्री. वसंत शंकर तावडे
(प्रमुख स्वयंपाकी)




श्री. साहेबराव श्रीधर मराठे
( स.पो.उप निरीक्षक)



श्री. शेखर गोपाळ पुजारी
( प्रमुख स्वयंपाकी)



श्रीमती. मंदाकीनी पंढरीनाथ पवार
(सहा.स्वयंपाकी)



श्री. न्हाऊ धाकु शिगाडें
(प्रमुख स्वयंपाकी)



श्री. कृष्णा भाऊ भालेकर
(प्रमुख स्वयंपाकी)



# प्रस्तावित उपक्रम

- योगा व मेडिटेशन सेंटर
- प्लास्टीक मुक्त परिसर
- बायोगॅस प्लॅन्ट
- गो ग्रीन प्रकल्प
- ई — टॉयलेट
- नविन प्रशासकिय भवन
- फायर सेम्पुलेटर

**********00000**********




पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ, मुंबई.
पोलीस कँप, विजय नगर, मरोळ, अंधेरी (पुर्व)—५९
फोन नं:०२२ २९२५०३२०,ई—मेल:**prin.ptsmarol@mahapolice.gov.in**